महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
539, राजेंद्रनगर, कोल्हापूर-416 004.

दुरध्वनी क्र-0231-2696101/2/3 Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/इ.12वी /परीक्षा/ 3393
दिनांक : 22/09/2026

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त क. महाविद्यालये,
सातारा, सांगली , कोल्हापूर.

विषय - इ.12 वी परीक्षेची आवेदनपत्रे भरण्यासाठी FYJC Online प्रवेशाचा data बाबत.
संदर्भ - 1.राज्य मंडळ कार्यालयाचे क्र.रा.मं./परीक्षा -3/3488 दिनांक 17/08/2026 चे पत्र.
2. क्र.कोविमं/इ.12वी /परीक्षा/2889 दि. 19/08/2026 रोजीचे या कार्यालयाचे पत्र.

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात येते की, फेब्रुवारी - मार्च 2027 मध्ये घेण्यात येणाऱ्या इ.12 वी परीक्षेची आवेदनपत्रे FYJC च्या उपलब्ध डेटाच्या आधारे घेण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सन 2026 मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी कॉलेज बदल/ शाखा बदल/ माध्यम बदल ऑनलाईन पध्दतीने केला आहे अशा विद्यार्थ्यांचा data मा. शिक्षण संचालक कार्यालयाकडून उपलब्ध झाला असून तो मंडळाच्या पोर्टलवर अपलोड केलेला आहे. सदर data फेब्रु 2027 परीक्षेचे आवेदनपत्रे भरण्याकरिता सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना त्यांच्या Login मध्ये उपलब्ध आहे याची सर्व क. महाविद्यालय प्रमुखांनी नोंद घ्यावी.

तथापि, काही नियमित विद्यार्थ्यांचा डेटा- डेटा बदल, नवीन प्रवेश अथवा तत्सम कारणांमुळे उपलब्ध होऊ शकत नाही. अशा विद्यार्थ्यांचा आवश्यक डेटा सोबत जोडलेल्या Excel नमुन्यामध्ये संकलित करुन, मा. उपसंचालक कार्यालयामार्फत विभागीय मंडळाकडून सदर माहितीची खातरजमा करुन घेणेत येणार आहे. त्यानंतर सदर Excel स्वरुपातील माहिती राज्य मंडळ, गणकयंत्र विभाग, पुणे यांचेकडे पाठविण्यात येईल व सदर माहिती पोर्टलवर अपलोड केल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांना भरता येणार आहेत याची नोंद घ्यावी. त्यामुळे ज्या नियमित विद्यार्थ्यांचा डेटा FYJC Online पोर्टलवर उपलब्ध आहे अशा सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे तातडीने Submit करावीत. तसेच ज्या उर्वरित विद्यार्थ्यांचा डेटा FYJC Online पोर्टलवर उपलब्ध नाही अशा विद्यार्थ्यांची माहिती कालमर्यादा लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या विहित Excel नमुन्यामध्ये **(Soft Copy तसेच Hard Copy)** संकलित करुन ती मंडळाकडे त्वरित समक्ष सादर करावी. कोणत्याही परिस्थितीत अशा विद्यार्थ्यांचा data मंडळाकडे सादर करणेस विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सोबत - विहित Excel नमुना.

(गजानन उकिर्डे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

| Sr.No. | College Index | udise | First Name | Father's Name | Surname | Mother name | DoB | SSC Seat No. | SSC Month | SSC Year | SSC Board | Reason |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

**(Principal Sign)**

**(College Stamp)**